# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ३०.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २९/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १५० वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ८५,९५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २९/१२/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०२ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन २७.७२ लिटर दारू असा एकुण १,२१,२०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. २९/१२/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०३ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण १,३०,८२०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**खुनाचा गुन्हा करणा—या विरूध्द अपराध दाखल :—**

दिनांक २९/१२/२०२२ रोजी पोस्टे आ.बाळापुर येथे कलम ३०२,५०६,३४ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील मयत आप्पाराव रामा राठोड हे त्याचा मुलगा फिर्यादी यास सरकारी नौकरी लावण्यासाठी दिलेले ९ लाख रू मागण्यासाठी मौ रामेश्वर तांडा येथे गेले असता यातील आरोपी यांनी संगणमत करून मयतास तुझ्या मुलांना जिवे मारतो अशी जिवे मारण्याची धमकी देवुन त्यांना विष पाजुन जिवे मारले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात आ.बाळापुर पोलीस तपास करित आहेत.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल गुन्हे:—**

दि. २९/१२/२०२२ रोजी पोस्टे कुरूंदा येथे कलम ३०४(अ),२७९,३३७,३३८ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील फिर्यादी चा भाउ हा आरोपी यांचे मोसा हिरो कंपनीची एमएच २० एफडब्ल्यु १६७५ हिच्यावर पाठीमागे बसुन करूंदा ते बोल्डा रोडने सिंदगी कडे जात असतांना आरोपीने त्याचे ताब्यातील मोसा भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोरून येणा—या निल गाईला जोराची धडक दिली त्यामुळे फिर्यादीचा भाउ त्रयंबक यांचे डोक्याला मार लागुन गंभीर जखमी करून मरणास कारणीभुत झाला आहे म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात कुरूंदा पोलीस तपास करित आहेत.